ePaper
797 कोटींचे नुकसान, 142 जणांचा मृत्यू; हिमाचल प्रदेशमध्ये पावसाचा कहर

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 08 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

वाकडवर शोककळा; तुषार भूमकरांचा अपघाती मृत्यू

## शिक्षकासह ७ जण ठार; २० विद्यार्थी जखमी

# थायलंडच्या शाळेत गोळीबार







**महाईन्यूज | बँकॉक**

**थायलंडची राजधानी बँकॉकजवळील नॉनथाबुरी प्रांतातील देबसिरीन नॉनथाबुरी शाळेत शुक्रवारी भीषण गोळीबाराची घटना घडली. एका १४ वर्षीय विद्यार्थ्याने शाळेत गोळीबार करण्यापूर्वी आपल्या आजी-आजोबांचीही हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. या हल्ल्यात किमान सात जणांचा मृत्यू झाला असून, २३ जण जखमी झाले आहेत. हल्लेखोराने नंतर स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली.**

गोळीबारामुळे शाळेच्या परिसरात मोठी घबराट पसरली. विद्यार्थी आणि शिक्षकांनी जीव वाचवण्यासाठी सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. पोलिस आणि बचाव पथकांनी घटनास्थळी पोहोचून जखमींना रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हल्लेखोराने आपल्या आजोबांच्या नावावर नोंद असलेल्या बंदुकीचा वापर केला. पोलिसांकडून हल्ल्यामागील नेमके कारण आणि विद्यार्थ्याला शस्त्र कसे मिळाले, याचा तपास सुरू आहे. देबसिरीन नॉनथाबुरी ही बँकॉकच्या वायव्य भागातील मोठी शाळा असून, येथे सुमारे तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. घटनेनंतर परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

थायलंडमध्ये यापूर्वीही मोठ्या प्रमाणात गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. २०२२ मध्ये नॉन्ग बुआ लाम्फू प्रांतातील बालसंगोपन केंद्रावर झालेल्या हल्ल्यात ३७ जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे या नव्या घटनेने देशातील शस्त्रास्त्रांच्या उपलब्धतेबाबत पुन्हा चिंता निर्माण झाली आहे.

### गोळीबारात २० विद्यार्थी जखमी, एकाची प्रकृती गंभीर

थायलंडचे शिक्षण मंत्री प्रसेर्ट जंताराुआंगटोंग यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, गोळीबारात अंदाजे २० विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उर्वरित विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. देबसिरिन नॉनथाबुरी स्कूल ही या भागातील एक लोकप्रिय खाजगी उच्च माध्यमिक शाळा असून, येथे ३,००० विद्यार्थी शिक्षण घेतात. हल्लेखोर हा त्याच शाळेतील एक विद्यार्थी होता, ज्याने पोलिसांच्या उपस्थितीत स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली.






### या गोंधळाची छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल

मिळालेल्या वृत्तानुसार, बँकॉकच्या वायव्येकडील बाहेरील भागात असलेल्या देबसिरिन नॉनथाबुरी शाळेत एका विद्यार्थ्याने आतमध्ये गोळीबार केल्याने घबराट पसरली. सोशल मीडियावर फिरणाऱ्या छायाचित्रांमध्ये बचाव पथके जखमींना रुग्णवाहिकांमध्ये घेऊन जाताना दिसत आहेत. एका छायाचित्रात एक माणूस स्ट्रेचरवर पडलेला दिसत आहे. विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे, तर आत अडकलेल्यांच्या किंकाळ्या ऐकू येत आहेत.

### १०.३ दशलक्षाहून अधिक लोकांकडे परवानाधारक शस्त्रे

फेब्रुवारीमध्ये, दक्षिण थायलंडमधील हाट याई जिल्ह्यातील एका शाळेत एका बंदूकधाऱ्याने गोळीबार करून एका शिक्षकाला ठार केले होते. खरे तर, आग्नेय आशियाई देश असलेल्या थायलंडमध्ये बंदुका बाळगण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे.



# वाकडवर शोककळा; तुषार भूमकरांचा अपघाती मृत्यू

## पहाटेच्या सुमारास मिसिंग लिंक बोगद्यात घडला अपघात; पाच जण जखमी

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील (यशवंतराव चव्हाण एक्सप्रेसवे) 'मिसिंग लिंक' बोगद्यात शुक्रवारी (७ ऑगस्ट) पहाटे सुमारे १.२० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. अतिवेगामुळे टोयोटा फॉर्च्युनर कारने समोरून जात असलेल्या आयशर मालवाहू टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दोन्ही वाहने उलटली. या दुर्घटनेत वाकड येथील तुषार भूमकर (वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.**



प्राथमिक माहितीनुसार, तुषार भूमकर हे पुण्यावरून मुंबईकडे प्रवास करत होते. मिसिंग लिंक बोगद्यात त्यांच्या फॉर्च्युनरने आयशर टेम्पोला जोरदार धडक दिल्यानंतर अपघाताची तीव्रता वाढली. धडकेनंतर दोन्ही वाहने रस्त्यावर उलटली. या अपघातात फॉर्च्युनरमधील एक जण गंभीर जखमी झाला असून अन्य तिघांना किरकोळ दुखापत झाली आहे. आयशर टेम्पोतील प्रवाशांनाही किरकोळ दुखापत झाली असून सर्व जखमींना एमएसआरडीसीच्या रुग्णवाहिकेद्वारे तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

हायवे सेफ्टी पेट्रोल (HSP), पुणे रेंजने तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. अपघातानंतरही पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात यश आले असून वाहनांच्या हालचालीत कोणताही मोठा अडथळा निर्माण झाला नाही. तुषार भूमकर हे पिंपरी-चिंचवडमधील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या पत्नीने यापूर्वी काँग्रेसच्या तिकिटावर महापालिका निवडणूक लढवली होती. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे वाकडसह संपूर्ण पिंपरी-चिंचवड परिसरात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. पोलिसांनी अपघाताची नोंद करून नेमके कारण आणि पुढील तपास सुरू केला आहे.

### पिंपरी चिंचवडमधील युवा नेत्याचा मृत्यू



तुषार भूमकर (३५) असे या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. तुषार काँग्रेसचे स्थानिक कार्यकर्ते होते. त्यांच्या पत्नी नुकत्याच झालेल्या पालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार होत्या. महामार्ग सुरक्षा गस्ती पथकाचे अधीक्षक (पुणे परिक्षेत्र) शिवाजी पवार यांनी या अपघाताबाबत इंडियन एक्सप्रेसला माहिती देताना, पहाटे सुमारे १.२० वाजता एसयूव्ही कारने ट्रकला मागून धडक दिली, असे सांगितले. पोलिसांनी कार चालकाला बेदरकारपणे वाहन चालविल्याबद्दल अटक केली आहे.


### मिसिंग लिंक बोगद्यात भीषण अपघात

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक बोगद्यात फॉर्च्युनरने आयशर टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिली. दोन्ही वाहने उलटून झालेल्या अपघातात वाकड येथील तुषार भूमकर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर अन्य काही जण जखमी झाले.

# पीएमआरडीएचे डिजिटल पाऊल; नियोजन माहिती झाली ऑनलाइन

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) नागरिक, गुंतवणूकदार, विकासक, वास्तुविशारद, अभियंते आणि विविध शासकीय विभागांना नियोजनविषयक माहिती सुलभ, पारदर्शक व डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी 'जीआयएस' (जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिम) आधारित सार्वजनिक पोर्टल विकसित केले आहे. या डिजिटल सुविधेमुळे नागरिकांना प्रादेशिक नियोजनाची सर्व प्राथमिक माहिती एकाच ठिकाणी आणि घरबसल्या उपलब्ध होणार आहे.**




या सार्वजनिक 'जीआयएस' पोर्टलवर 'पीएमआरडीए' कार्यक्षेत्राची सीमा, मंजूर प्रादेशिक योजना (आरपी), प्रस्तावित नगररचना योजना (टीपी स्कीम), गावहद्द तसेच महानगरपालिका व नगरपरिषदांच्या सीमांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासोबतच एमएसआरडीसी व पीएमआरडीए रिंग रोड, पुणे मेट्रो मार्ग, रेल्वे मार्ग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वर्गीकृत रस्ते आणि मेट्रो स्थानकांभोवतीचे टीओडी (ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट) झोन या पायाभूत सुविधांच्या लेअर्सचाही समावेश आहे. पर्यावरण व सुरक्षेच्या दृष्टीने पाटबंधारे विभागाच्या पूर लाल व निळ्या रेषा, वन्यजीव अभयारण्य, हिल स्टेशन व टाउनशिपच्या सीमा तसेच एनडीए, एचईएमआरएल, एमएडीसी (पुरंदर विमानतळ) आणि इतर संरक्षण विभागांचे बफर झोन यांची माहितीही या पोर्टलवर टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे.

> "पीएमआरडीए'च्या कार्यक्षेत्रातील नियोजन आणि विकास प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान व नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हे जीआयएस आधारित सार्वजनिक पोर्टल अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. नागरिकांना आता त्यांच्या भूखंडाच्या परिसरातील रस्ते, पूररेषा, मेट्रो मार्ग आणि प्रादेशिक नियोजनाची अधिकृत प्राथमिक माहिती घरबसल्या एका क्लिकवर मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ वाचेल आणि 'पीएमआरडीए' कार्यालयाच्या फेऱ्याही कमी होतील. 'डिजिटल गव्हर्नन्स'ला चालना देत पारदर्शक व सुलभ प्रशासन देण्यासाठी 'पीएमआरडीए' कटिबद्ध आहे."
> 
> **- डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए**

या पोर्टलमुळे भूखंड किंवा मालमत्तेच्या परिसरातील नियोजनाची माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना 'पीएमआरडीए' कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता उरणार नाही. त्यामुळे वेळ, पैसा आणि शासकीय पाठपुराव्याचा ताण कमी होणार आहे. तसेच, विकासक, वास्तुविशारद व अभियंत्यांना विकास प्रस्ताव तयार करताना आवश्यक असणारी अधिकृत प्राथमिक माहिती सहज उपलब्ध होणार आहे. या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे नियोजन प्रक्रियेतील पारदर्शकता वाढून विविध शासकीय विभागांमधील माहितीचा समन्वय सुधारण्यास मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'डिजिटल गव्हर्नन्स'ला चालना देणे आणि शाश्वत विकासासाठी माहितीआधारित निर्णय घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

### डिजिटल गव्हर्नन्सला चालना

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल गव्हर्नन्सला चालना देणे आणि शाश्वत विकासासाठी माहितीआधारित निर्णय घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यामुळे पीएमआरडीएच्या नियोजन व विकास प्रक्रियेला अधिक गतिमान आणि नागरिकाभिमुख स्वरूप मिळणार आहे.

# राष्ट्रवादीला भाजपाची धास्ती? 'एसआयआर'साठी धावाधाव!

## अजित गव्हाणे यांची एन्ट्री होणार? नव्या राजकीय समीकरणांवर पार्थ पवार यांचा निर्णय निर्णायक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडे संघटनात्मक कामगिरी सुमार आहे. त्यामुळे प्रतिस्पर्धी भारतीय जनता पार्टीने 'एसआयआर' म्हणजे मतदार पडताळणी मोहीमेत घेतलेली आघाडी आणि त्यामुळे स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीची वाढलेली धास्ती स्पष्टपणे दिसू लागली आहे. आगामी लोकसभा, विधानसभा आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये 'एसआयआर'मधील कामगिरी निर्णायक ठरणार आहे. मात्र, संघटनात्मक कामगिरी अभावी राष्ट्रवादीची धावाधाव सुरू असून, यामुळे "भाजपा पॅटर्न" राबवण्यात येत असल्याचे वृत्त आहे.**




भाजपाने मतदार पडताळणी (SIR), बूथनिहाय संघटनबांधणी आणि प्रभागनिहाय निवडणूक तयारीला वेग दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडून बैठकांवर जोर दिला आहे. सोबतच एसआयआर साठी कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यामुळे "राष्ट्रवादीला भाजपाची धास्ती लागली आहे का?" असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

वास्तविक, भाजपाने बूथ प्रमुख, शक्ति केंद्र प्रमुख, पन्नाप्रमुख आणि एसआयआर मोहिमेद्वारे मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी व्यापक मोहीम सुरू आहे. त्याला यश मिळताना दिसते. गेल्या काही महिन्यांत भाजपाने शहरात संघटन विस्तारावर विशेष भर दिला आहे. प्रत्येक प्रभागात कार्यकर्त्यांची फळी उभी करणे, नवीन मतदारांपर्यंत पोहोचणे आणि निवडणुकीसाठी सूक्ष्म नियोजन करणे या रणनीतीवर पक्ष काम करत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थापनेपासून २०१७ पर्यंत पिंपरी-चिंचवडमध्ये निर्विवाद सत्ता असलेल्या राष्ट्रवादीला आता विरोधी बाकावर बसावे लागले आहे. शहरातील तीनपैकी दोन विधानसभा, दोन पैकी एक लोकसभा आणि १२८ पैकी ८५ नगरसेवकपदाच्या जागांवर पराभव पत्करावा लागला आहे. आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक पातळीवरील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे राष्ट्रवादीसमोर पूर्वीची ताकद कायम ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अनेक नेत्यांची पक्षांतरं, बदलते सामाजिक समीकरण आणि भाजपाचे वाढते संघटन यामुळे राष्ट्रवादी अधिक आक्रमक भूमिका घेत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### संघटन विरुद्ध सत्तेचा आधार

राजकीय निरीक्षकांच्या मते, केवळ सत्तेत सहभाग असल्याने निवडणूक जिंकता येत नाही. त्यासाठी बूथस्तरावरील सक्षम संघटन, प्रशिक्षित कार्यकर्ते आणि मतदारांशी सातत्यपूर्ण संपर्क आवश्यक असतो. याच बाबतीत भाजपा आघाडीवर असल्याचे दिसत असून, राष्ट्रवादी आता ही उणीव भरून काढण्याच्या प्रयत्नात आहे. पण, एसआयआर मोहीम अंतिम टप्प्यात पोहोचत असताना राष्ट्रवादीने संघटनात्मक हालचालींना गती दिली आहे. त्यामुळे ही तयारी उशिरा सुरू आहे. घाईघाईने सुरू केलेल्या मोहिमेचा किती फायदा होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### भाजपाच्या कार्यपद्धतीची कॉपी?

विशेष म्हणजे, आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूकपूर्व संघटनात्मक मोहिमांवर फारसा भर दिला जात नव्हता. मात्र, भाजपाने एसआयआर मोहिमेला प्राधान्य दिल्यानंतर राष्ट्रवादीनेही कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या, प्रभागनिहाय बैठका आणि मतदारांशी थेट संपर्क वाढविण्यावर भर दिला आहे. त्यामुळे भाजपाने आखलेल्या रणनीतीचाच अवलंब राष्ट्रवादी करीत आहे. पण, त्याला पक्षाच्या कार्यकर्त्यांचा अपेक्षीत प्रतिसाद मिळत नाही. किंबहुना, स्थानिक पातळीवर पक्षाची धुरा सांभाळणारे शहराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते योगेश बहल संघटनात्मक कामगिरी उंचावण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. पण, अपेक्षीत यश मिळताना दिसत नाही.

### प्रत्येक मतदारावर भाजपाचे लक्ष

भाजपाने मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, नवीन मतदारांची नोंदणी, स्थलांतरित मतदारांची पडताळणी आणि बूथनिहाय माहिती संकलनावर भर दिला आहे. त्यामुळे प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याची पक्षाची रणनीती स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, भाजपाचे नेते तथा आमदार महेश




लांडगे यांचा "बालेकिल्ला" म्हणून ओळखला जाणारा भोसरी विधानसभा मतदार संघात सर्वाधिक 'एसआयआर' मोहीम राबवण्यात आली आहे. त्यामुळे भाजपाचे प्रत्येक मतदारावर लक्ष आहे, तर राष्ट्रवादीचे भाजपाच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष आहे, असे चित्र आहे.

# फॉर्च्युनर बँकेच्या ताब्यात, तरीही झाली गायब; व्यावसायिकावर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**थरमॅक्स चौक, संभाजीनगर (चिंचवड) येथील श्री गजानन लोकसेवा सहकारी बँक लिमिटेडच्या ताब्यात असलेली सुमारे ₹56 लाख किमतीची टोयोटा फॉर्च्युनर कार परवानगीशिवाय घेऊन गेल्याप्रकरणी निगडी पोलिसांनी एका व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**




या प्रकरणी संजय वासुदेव जोशी (वय 67, वारजे, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून हसमुख राजाराम भाटी (वय 35, माणिकबाग, पुणे) यांच्याविरुद्ध निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 520/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 303(2), 316, 317(2) आणि 318(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीची पत्नी पिंकी हसमुख भाटी यांनी टोयोटा फॉर्च्युनर कार खरेदीसाठी श्री गजानन लोकसेवा सहकारी बँककडून ₹42 लाखांचे वाहन कर्ज घेतले होते. मात्र, कर्जासाठी सादर करण्यात आलेली निवासी व व्यावसायिक मालमत्ता त्यांच्या नावावर नसल्याचे बँकेच्या निदर्शनास आले. त्यानंतर संबंधित फॉर्च्युनर वाहन सिंहगड पोलिसांच्या माध्यमातून बँकेच्या ताब्यात देण्यात आले होते. दरम्यान, 26 जून 2025 रोजी दुपारी सुमारे 1.30 वाजता बँकेच्या ताब्यात असलेली एमएच-12-XX-5929 क्रमांकाची फॉर्च्युनर कार आरोपीने बँकेची परवानगी न घेता, दिशाभूल करून व कथित लबाडीच्या हेतूने बँकेसमोरील रस्त्यावरून घेऊन गेल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या घटनेनंतर निगडी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. आरोपीने वाहन कशा प्रकारे ताब्यात घेतले, तसेच वाहनाचा सध्याचा ठावठिकाणा काय आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत.

### बँकेच्या ताब्यातील फॉर्च्युनर लंपास

श्री गजानन लोकसेवा सहकारी बँकेच्या ताब्यात असलेली टोयोटा फॉर्च्युनर परवानगीशिवाय घेऊन गेल्याप्रकरणी निगडी पोलिसांनी व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. वाहनाचा सध्या ठावठिकाणा शोधण्यासाठी पोलिसांचा तपास सुरू आहे.



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडिओ काही काळ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून हटविणे तसेच डीपफेक आणि बाललैंगिक शोषणाशी संबंधित मजकुराच्या प्रसारणाच्या प्रकरणानंतर 'मेटा'ने भारत सरकारची माफी मागितली. कंपनीने या घटनेचे कारण 'तांत्रिक चूक' असल्याचे सांगितले.**

# 'मेटा'च्या माफीच्या मर्यादा; उत्तरदायित्वाची खरी परीक्षा






मात्र, जगभरातील अनुभव पाहता अशा प्रकारच्या चुका केवळ तांत्रिक नसून व्यवस्थापन, धोरणे आणि उत्तरदायित्वाशी संबंधित असल्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

'मेटा' ही फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपसारख्या अब्जावधी वापरकर्त्यांच्या प्लॅटफॉर्मची मालकी असलेली कंपनी आहे. भारत हा तिच्यासाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक आहे. त्यामुळे येथे घडणाऱ्या प्रत्येक निर्णयाचा परिणाम कोट्यवधी नागरिकांवर होतो. अशा परिस्थितीत एखादा व्हिडिओ हटविला जाणे किंवा हानिकारक मजकूर मोठ्या प्रमाणात प्रसारित होणे ही साधी चूक मानता येणार नाही. कारण कोणता मजकूर किती लोकांपर्यंत पोहोचेल, हे ठरविण्यात कंपनीचे अल्गोरिदम महत्त्वाची भूमिका बजावतात.

भारत सरकारने यावेळी माहिती तंत्रज्ञान कायद्यातील 'सेफ हार्बर' संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करून 'मेटा' केवळ मध्यस्थ नसल्याचा युक्तिवाद केला. जर एखादी कंपनी मजकुराचे वितरण नियंत्रित करत असेल, तर त्याबाबत तिची जबाबदारीही निश्चित झाली पाहिजे. विशेषतः डीपफेक, बाललैंगिक शोषणाशी संबंधित सामग्री किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीच्या प्रसारासारख्या गंभीर विषयांत केवळ माफी पुरेशी ठरत नाही.

यापूर्वीही मलेशिया, अमेरिका आणि युरोपमध्ये 'मेटा'ला अशाच कारणांमुळे माफी मागावी लागली आहे. डेटा गोपनीयता, मुलांची ऑनलाइन सुरक्षा आणि चुकीच्या माहितीच्या प्रसारावर नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्याबद्दल कंपनीवर मोठे दंडही ठोठावले गेले आहेत. तरीही अशा घटना वारंवार घडत असल्याने 'माफी मागा आणि पुढे चला' हीच कंपनीची कार्यपद्धती बनल्याची टीका केली जाते.

डिजिटल माध्यमांनी संवाद आणि माहितीची देवाणघेवाण अधिक वेगवान केली असली, तरी त्याचबरोबर त्यांची सामाजिक जबाबदारीही वाढली आहे. कोट्यवधी नागरिकांच्या मतांवर, निवडणुकांवर आणि सामाजिक वातावरणावर प्रभाव टाकण्याची क्षमता असलेल्या कंपन्यांना केवळ व्यावसायिक संस्थांच्या चौकटीत पाहता येणार नाही. पारदर्शक अल्गोरिदम, प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा आणि कायद्याचे काटेकोर पालन ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे.

माफी हा कोणत्याही चुकीचा शेवट नसतो; ती सुधारण्याची सुरुवात असली पाहिजे. भारतासह जगातील सरकारांनी डिजिटल कंपन्यांच्या उत्तरदायित्वासाठी स्पष्ट आणि कठोर नियमांची अंमलबजावणी केली, तरच तंत्रज्ञानाचा वापर लोकशाही, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि नागरिकांच्या सुरक्षेला पूरक ठरेल. अन्यथा 'मेटा'सारख्या कंपन्यांची वाढती ताकद भविष्यात लोकशाही संस्थांसाठी गंभीर आव्हान ठरू शकते.

## प्रासंगिक »

### सत्कारणी दान

**एका गावात शिमक नावाचा एक श्रीमंत पण अत्यंत विचारपूर्वक खर्च करणारा माणूस राहत होता. तो पैशाची उधळपट्टी करत नसे, म्हणून लोक त्याला कंजूष म्हणत. एकदा तो आजारी पडला.**

औषधांवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी निसर्गावर विश्वास ठेवत त्याने साधा उपचार स्वीकारला. त्यामुळेही लोकांनी त्याची खिल्ली उडवली. काही दिवसांनी विद्वान आचार्य महिधर यांनी वेदांवरील ग्रंथ लिहिल्याचे शिमकला समजले. मात्र, ते प्रकाशित करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. हे कळताच शिमक स्वतः आचार्यांकडे गेला आणि ग्रंथप्रकाशनासाठी आवश्यक तेवढी संपूर्ण आर्थिक मदत दिली.

त्याने सांगितले की, ज्ञान समाजापर्यंत पोहोचणे हेच खरे दान आहे. ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर सर्वांनी शिमकच्या उदारतेचे कौतुक केले. त्यावर शिमक म्हणाला, "स्वतःसाठी पैसा खर्च करणे सोपे असते; पण समाजाच्या कल्याणासाठी संपत्तीचा उपयोग करण्यातच खरी समाधानाची भावना आहे."

- तात्पर्य : **संपत्तीचा उपयोग समाजहितासाठी केल्यासच तिचे खरे सार्थक होते.**

भारताला जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या लाभली आहे. डिजिटल युगात वाढलेली जेन-झी ही माहिती, तंत्रज्ञान आणि जागतिक संधींशी जोडलेली पिढी आहे.

# संधी आहेत, पण रोजगाराचा दुवा कमकुवत

ऑनलाइन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप आणि फ्रीलान्सिंग यांसारख्या नव्या संधी या पिढीसमोर उपलब्ध आहेत. मात्र, या सर्व संधी असूनही लाखो सुशिक्षित तरुणांना अपेक्षित रोजगार मिळत नसल्याचे वास्तव चिंताजनक आहे. हा प्रश्न केवळ बेरोजगारीचा नसून शिक्षण, कौशल्ये आणि रोजगार यांच्यातील वाढत्या विसंगतीचा आहे.

भारत स्वतःला 'युवकांचा देश' म्हणवतो, परंतु लोकसंख्यात्मक लाभांशाचा खरा फायदा मिळवण्यासाठी तरुणांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये आणि सन्मानजनक रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज अनेक तरुण पदवीधर असूनही त्यांच्या शिक्षणाशी सुसंगत नोकरी मिळत नाही. परिणामी, निराशा, असुरक्षितता आणि भविष्याबद्दलची चिंता वाढताना दिसते.




विविध अहवालांनुसार देशातील बेरोजगारांमध्ये तरुणांचे प्रमाण सर्वाधिक आहे. नियमित वेतनाची नोकरी मिळवणाऱ्या युवकांची संख्या मर्यादित आहे, तर मोठा वर्ग असंघटित किंवा हंगामी रोजगारावर अवलंबून आहे. महिलांची परिस्थिती अधिक गंभीर असून, अनेक तरुणी घरगुती जबाबदाऱ्यांमुळे श्रमबाजारापासून दूर राहतात. ही स्थिती देशाच्या आर्थिक प्रगतीलाही बाधा आणणारी आहे.

जेन-झीची कामाकडून असलेली अपेक्षा पूर्वीच्या पिढ्यांपेक्षा वेगळी आहे. ही पिढी केवळ पगारासाठी नोकरी करत नाही; तर कामाचे वातावरण, लवचिक वेळा, कौशल्यविकास, तंत्रज्ञानाचा वापर आणि वैयक्तिक प्रगती यांनाही तितकेच महत्त्व देते. त्यामुळे पारंपरिक रोजगाराच्या चौकटीत बदल करणे आणि आधुनिक कार्यसंस्कृती स्वीकारणे काळाची गरज बनली आहे.

सरकार, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्रितपणे कौशल्याधारित शिक्षणाला चालना देणे, उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम अद्ययावत करणे आणि नवउद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. गिग इकॉनॉमी आणि डिजिटल रोजगार क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांसाठी सामाजिक सुरक्षा, विमा आणि कायदेशीर संरक्षणाची प्रभावी व्यवस्था उभी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

भारताच्या विकासाचा पाया मजबूत करायचा असेल, तर तरुणांच्या क्षमतेचा योग्य उपयोग करणे अपरिहार्य आहे. रोजगारनिर्मिती ही केवळ संख्येची नव्हे, तर गुणवत्तेचीही असली पाहिजे. शिक्षण, कौशल्ये आणि रोजगार यांच्यात प्रभावी दुवा निर्माण झाल्यासच भारताचा लोकसंख्यात्मक लाभांश खऱ्या अर्थाने देशाच्या विकासाचे शक्तिशाली इंजिन ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



माझिया मीपणा ।
जाला यावरी उगाणा ॥१॥

भोगी त्यागी पांडुरंग ।
त्यानें वसविलें अंग ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कर्जमाफीचा ५,०२९ कोटींचा पहिला हप्ता बँकांकडे

## ६ लाख २६ हजार शेतकऱ्यांना लाभ; कर्जखाती शून्यावर आणून नव्या पीक कर्जाचा मार्ग मोकळा

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**

**गेल्या काही दिवसापासून प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली असून राज्य सरकारने ५०२९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता बँकांकडे सुपूर्द केला असल्याचे बँकेतील सूत्रांनी सांगितले. राज्यातील शेतकऱ्यांसाठी ३१ लाख ५० हजार कोटी रुपयांपर्यंतची पीक कर्जमाफी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती.**



कोणते शेतकरी कर्जमाफीत पात्र ठरतील हेही बँकांनी ठरविल्यानंतर १६ लाख ९६ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा हप्ता देण्याचे ठरविण्यात आले. या यादीतील सहा लाख २६ हजार शेतकऱ्यांना पाच हजार २९ कोटी रुपयांचा हप्ता मंजूर करून तो बँकेकडे वळविण्यात आला आहे. त्यामुळे उद्यापासून कर्ज खाते शून्यावर येतील आणि पुढील पीक कर्ज मिळण्यास सुरुवात होईल असे सांगितले जात आहे.

शेतकऱ्यांची कर्जमाफीमध्ये बँकाचा 'हेअर कट' अधिक असल्याने कर्जमाफीबाबत संभ्रम निर्माण होऊ लागले होते. मात्र, शेतकऱ्यांचे कर्जखाते शुन्यावर आणून त्यांना नव्याने पीक कर्ज देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून स्पष्ट केले होते. आता केवायसी करुन पीक कर्ज खाते शुन्यावर आणले जाईल आणि नवी कर्जमागणी मंजूर करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अद्यापि जिल्हानिहाय यादी प्रकाशित झाली नाही. मात्र, पहिला हप्ता बँकाकडे वर्ग करण्यात आला आहे.

राज्य सरकारची ही तिसरी कर्जमाफी आहे. यामुळे शेतकऱ्यांचा मोठा भार कमी होईल असा दावा केला जात आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात पुन्हा हवामान बदलाचा मोठा फटका जाणवू शकतो, अशी चिन्हे असल्याने ही कर्जमाफी अधिक महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

### ५,०२९ कोटींचा पहिला हप्ता बँकांकडे

राज्य सरकारने कर्जमाफीचा पहिला हप्ता बँकांकडे वर्ग केला असून, पहिल्या टप्प्यात ६ लाख २६ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. संबंधित कर्जखाती शून्यावर आणल्यानंतर शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### कर्जमाफीसाठी बँकांची स्थिती

राष्ट्रीयीकृत बँका : १२ | १५ लाख ९९ हजार ४४ खाती

जिल्हा मध्यवर्ती बँका : ३० | १० लाख ७४७ खाती

खासगी बँका : १० | ४६ हजार ९८९ खाती

महाराष्ट्र ग्रामीण बँक : १ | ४ लाख ७० हजार ६१९ खाती

एकूण : ५३ बँका | ३१ लाख २४ हजार खाती

# गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी लालपरी सज्ज; कोकणात ५,२२० जादा बसेस



**महाईन्यूज । मुंबई**

**श्री गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असून, बाप्पाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) सज्ज झाले आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि परिसरातील कोकणवासीयांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या गणेशोत्सवानिमित्त एसटी महामंडळाने यंदा ७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत ५,२२० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**

गणेशोत्सवाच्या जादा वाहतुकीच्या नियोजनासंदर्भात एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या भावविश्वाशी घट्ट जोडलेला सण आहे. किंबहुना, गणपती बाप्पा, कोकणातील रहिवासी आणि एसटी यांचे अतूट नाते आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही नफा-तोट्याचा विचार न करता कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सज्ज आहे. यंदा सुमारे ५,२२० जादा बसेस कोकणातील विविध मार्गांवर धावणार आहेत, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात एसटीची वाहतूक सुरळीत राहावी यासाठी सर्व प्रमुख बसस्थानके आणि बसथांब्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहतील.

तसेच कोकणातील प्रमुख महामार्गांवर आवश्यक त्या ठिकाणी वाहनदुरुस्ती पथके तैनात करण्यात येणार असून, प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि अखंड सेवा देण्यासाठी सर्वतोपरी व्यवस्था करण्यात आली आहे.

### गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणावर जादा बसेस

नुकत्याच पार पडलेल्या आषाढी एकादशी यात्रेसाठी एसटी महामंडळाने ५,२०० जादा बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. त्या सेवेला भाविक व प्रवाशांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्याच धर्तीवर गणेशोत्सवासाठीही मोठ्या प्रमाणावर जादा बसेस उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या जादा बसेसचे आरक्षण NPUBLIC.MSRTCORS.COM या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रवाशांना बसस्थानकांवर तसेच MSRTC BUS RESERVATION या अधिकृत मोबाईल ॲपद्वारेही आरक्षण करता येणार आहे.

### १० ऑगस्टपासून गट आरक्षणास प्रारंभ

किमान ४० प्रवाशांच्या गटासाठी १० ऑगस्टपासून गट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गट आरक्षणामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के भाडे सवलत लागू राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त ७ सप्टेंबरपासून मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातील प्रमुख बसस्थानकांतून या जादा बसेसचे संचालन करण्यात येणार आहे.

### महामार्गांवर दुरुस्ती पथके

गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक सुरळीत राहावी यासाठी प्रमुख बसस्थानके आणि बसथांब्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. कोकणातील प्रमुख महामार्गांवर आवश्यक ठिकाणी वाहनदुरुस्ती पथकेही तैनात करण्यात येणार आहेत. प्रवाशांना सुरक्षित आणि अखंड सेवा देण्यासाठी एसटीकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे.

# तज्ज्ञांनीच विकला NEET चा पेपर

## सीबीआयच्या आरोपपत्रात NTA च्या ३ विषय तज्ज्ञांसह १३ आरोपींची नावे

महाईन्यूज । नवी दिल्ली

**नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयने दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू येथील विशेष सीबीआय न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रात सीबीआयने एनटीए-नियुक्त तीन विषय तज्ज्ञांसह १३ आरोपींची नावे दिली आहेत. सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात नीट पेपरफुटी सुनियोजित, बहुराज्यीय गुन्हेगारी कट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या विषय तज्ज्ञांनी प्रश्नपत्रिका फोडल्या आणि मध्यस्थांच्या मार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या असा आरोप सीबीआयने केला आहे.**




सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात तीन विषय तज्ज्ञांची नावे आहेत. याममध्ये वनस्पतीशास्त्र विषयाच्या मनिषा गुरुनाथ मांढरे, रसायनशास्त्राच्या प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी आणि भौतिकशास्त्राच्या मनिषा संजय हवालदार यांच्या नावाचा समावेश आहे. या तिघांनी प्रश्नपत्रिका फोडल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. या तिघांच्या मार्फत प्रश्नपत्रिका कोचिंग चालक आणि मध्यस्थांकडे सोपविण्यात आल्या आणि तिथून पुढे विद्यार्थ्यांना देण्यात आल्याचा आरोप सीबीआयने केला आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी आरोपींवर भारतीय न्याय संहिता, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ च्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या विषय तज्ज्ञ, कोचिंग क्लासेसचे चालक आणि मध्यस्थी यांचे मोठे जाळे असून, यांच्याकरवी पैशांसाठी पेपरफुटी झाल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. एनटीएचे विषय तज्ज्ञ यांच्याशिवाय आरोपपत्रात तेजस शाह, शिवराज मोटेगांवकर, डॉ. मनोज शिरुरे, मनिषा संजय वाघमारे, धनंजय लोखंडे, शुभम खैरनार, यश यादव, मांगिलाल बिवाल, दिनेश बिवाल, विकास बिवाल यांचा समावेश आहे.




### पैशांसाठी फोडल्या प्रश्नपत्रिका

पेपरफुटीत अटक करण्यात आलेल्या प्रत्येकाने प्रश्नपत्रिका फोडण्यासाठी काम केल्याचे सीबीआयने म्हटले आहे. यामुळे प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि पैशांची देवाणघेवाण करणे यांचा समावेश आहे. सीबीआयच्या आरोपपत्रानुसार जप्त करण्यात आलेले मोबाईल फोन, पेन ड्राईव्ह आणि इतर इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसची फॉरेन्सिक तपासणी केली जात आहे. फाईल्स शेअर करण्यासाठी टेलिग्राम, व्हॉट्सअप आणि इतर मेसेजिंग ॲपचा वापर करण्यात आला आहे. आरोपींनी डिजिटल माध्यमांचा केलेला वापर यामुळे तपास करणे सोपे गेल्याचे सीबीआयने म्हटले आहे.

# शेख हसीनांची घरवापसी; भारत-बांगलादेश संबंधांवर काय होणार परिणाम?

महाईन्यूज । बांगलादेश

**बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना या पंतप्रधान पदावरून पायउतार झाल्यानंतर दोन वर्षांत प्रथमच माध्यमांसमोर आल्या. भारतात वास्तव्यास असलेल्या हसीना यांनी बुधवारी, ६ ऑगस्टला ऑनलाइन पत्रकार परिषद घेत बांगलादेशात परतण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तसेच, बांगलादेशातील जनतेसोबत उभे राहून त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी काम करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**



### शेख हसीना काय म्हणाल्या?

शेख हसीना यांनी अनेक मुद्द्यांवर भावनिकरित्या भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी विशेषत: बांगलादेशातील हिंसाचाराबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच बांगलादेशातील राजकीय अस्थिरता, सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचे नुकसान, पोलिसांच्या हत्या आणि माध्यमांवरील हल्ला या मुद्द्यांचा उल्लेख केला. तसेच, देशाची अर्थव्यवस्था घसरल्याचा दावा करत त्यांनी जीडीपी वाढीचा दर ६.८ टक्क्यांवरून २.२ टक्क्यांवर आल्याचे सांगितले.

हसीना यांच्या या पत्रकार परिषदेला मोठे राजकीय महत्त्व असल्याचे मानले जाते. त्यांची संवाद साधण्याची वेळ, भारतातून केलेले वक्तव्य आणि पत्रकारांच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे तसेच त्यांची सावध भूमिका यामुळे त्यांच्या भविष्यातील राजकीय वाटचाल कशी असेल, तसेच बांगलादेशातील राजकारण आणि भारत-बांगलादेश संबंधांवर त्याचा काय प्रभाव पडणार याबद्दल चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, हसीना यांच्या पत्रकार परिषदेनंतर बांगलादेशने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन जारी करत म्हटले की, "मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांत दोषी ठरलेल्या आणि फरार असलेल्या शेख हसीना यांना नवी दिल्लीतून थेट माध्यमांशी संवाद साधण्याची परवानगी देण्यात आली," अशा शब्दांत बांगलादेश सरकारने आक्षेप नोंदवला.

ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात हसीना सरकारविरोधी तीव्र आंदोलन झाले. जनतेतील वाढता रोष पाहता शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला आणि बांगलादेश सोडून भारतात पलायन केले होते. त्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून त्या भारतातील गुप्त ठिकाणी राहत आहेत. याआधी त्यांनी जानेवारीमध्ये दक्षिण आशियाई परदेशी पत्रकार संघात (FOREIGN CORRESPONDENTS' CLUB OF SOUTH ASIA) ऑडियो क्लिपद्वारे माध्यमांशी संवाद साधला होता. मात्र, त्यावेळी त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली नव्हती. विशेष म्हणजे हा संदेश बांगलादेशच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अवघ्या महिनाभर आधी प्रसारित झाला होता.

यावेळी मात्र शेख हसीना यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना थेट उत्तरे दिली आहेत. या संवादात त्यांचे पुत्र आणि अमेरिकेत वास्तव्यास असलेले सजीब वाझेद जॉय हेही ऑनलाइन सहभागी झाले होते. जॉय यांनी हसीना सरकारमध्ये सल्लागार म्हणून काम केले होते.



# करण-अर्जुन एकत्र..

लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस ट्रेंटी' चा पहिला प्रोमो निर्मात्यांनी प्रदर्शित केला आहे. यामध्ये सलमान खान होस्ट म्हणून परत येताना दिसत आहे. प्रोमोमध्ये सलमानने 'करण-अर्जुन'चा उल्लेख करून एक नवीन सस्पेन्स निर्माण केला आहे. 'करण-अर्जुन' चित्रपटात सलमान आणि शाहरुख खान एकत्र होते. सल्लूने दिलेली हिंट पाहता 'बिग बॉस ट्रेंटी'मध्ये सलमान आणि शाहरुख दिसणार, हे निश्चित मानले जात आहे. हा नवीन सीझन ६ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. प्रसिद्ध केलेल्या प्रोमोमध्ये सलमान एका घोड्यासह चालताना दिसत आहे. व्हिडिओच्या शेवटी वर्स म्हणतो, "जे करण-अर्जुनमध्ये घडले होते, ते आता बिग बॉसमध्ये पुन्हा घडेल... तथास्तु!" सलमानच्या या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर अनेक प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. असे अंदाज लावले जात आहेत की, ग्रँड प्रीमियरला शाहरुखदेखील सलमानसोबत दिसू शकतो. तर काही रिपोर्ट्समध्ये असा दावाही केला जात आहे की, या सीझनमध्ये स्पर्धक जोड्यांमध्ये खेळतील किंवा शोमध्ये दोन विजेते असू शकतात. या शोसंदर्भात सलमान म्हणाला, "बिग बॉसचा प्रत्येक सीझन एक नवीन गेम आणि अनपेक्षित ट्विस्ट घेऊन येतो. पण या सीझनच्या केंद्रस्थानी एक असे रहस्य आहे, जे याला मागील सर्व सीझनपेक्षा वेगळे बनवते. याची पहिली हिंट प्रोमोमध्येच आहे, जी तुम्हाला काळजीपूर्वक पाहावी लागेल."



# 'राका'त नाइलाची एन्ट्री

फिल्ममेकर एटली नवा चित्रपट 'राका' घेऊन येत आहेत. या चित्रपटात अल्लू अर्जुन मुख्य भूमिकेत असणार आहे. तर बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदूकोन यात नायिकेची भूमिका साकारत आहे. आता या चित्रपटाशी नाइला अग्रवालही जोडली गेली आहे. नाइलाने एटलीचे कौतुक करत तो वेगळ्या प्रकारची कहाणी मांडण्याच्या शैलीवर काम करत असल्याचे उद्गार काढले आहेत. इतक्या मोठ्या चित्रपटाला मूर्त रुप देण्यासाठी जितकी मेहनत आवश्यक आहे तितकी तोच करू शकतो असेही तिने म्हटले आहे. बॉलिवूडमध्ये स्वतःच्या 11 वर्षांच्या कारकीर्दीनंतर 'राका'मधून दक्षिणेत पदार्पण करत आहे. राका चित्रपटाची संधी मिळताच मी एटलीसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती, असे नाइलाने म्हटले आहे. 2015 साली इम्तियाज अली यांचा चित्रपट 'तमाशा'द्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी नाइला अलिकडेच 'मामला लीगल है'च्या सीझन 2 मध्ये वकिलाच्या भूमिकेत दिसून आली होती.




# जयंती 2 चा जबरदस्त टीझर प्रदर्शित

मराठी चित्रपटसृष्टीत काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'जयंती' या चित्रपटाने सामाजिक आशयामुळे प्रेक्षकांची मने जिंकली होती. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा तरुणांवर होणारा सकारात्मक प्रभाव प्रभावीपणे मांडणाऱ्या या चित्रपटाला मोठा प्रतिसाद मिळाला होता.

आता या यशस्वी चित्रपटाचा पुढील भाग 'जयंती २' येत्या ११ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, नुकताच त्याचा दमदार टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे.

टीझरमधून 'जयंती २' हा चित्रपट सध्याच्या शिक्षण व्यवस्थेशी निगडित गंभीर विषय हाताळणार असल्याचे स्पष्ट होते. ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीला शिक्षण घेताना सहन करावा लागणारा भेदभाव आणि त्यातून उभे राहणारे प्रश्न याभोवती चित्रपटाची कथा फिरणार असल्याचे संकेत टीझरमध्ये देण्यात आले आहेत.

चित्रपटात संत्या या लोकप्रिय पात्राच्या भूमिकेत पुन्हा एकदा अभिनेता ऋतुराज वानखेडे झळकणार आहे. त्याच्यासोबत पायल जाधव, प्रियदर्शनी इंदलकर, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, राजकुमार जरांगे आणि मानसी सुभाष यांसारखी दमदार कलाकारांची फळीही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहे.

'जयंती २'ची निर्मिती मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओने केली असून, चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शनाची धुरा शैलेश बळीराम नरवाडे यांनी सांभाळली आहे. संजीवकुमार हिल्ली यांनी छायांकन केले असून फैसल महाडिक यांनी संकलनाची जबाबदारी पार पाडली आहे.

२०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जयंती'ने वेगळ्या विषयामुळे आणि प्रभावी मांडणीमुळे प्रेक्षकांसह समीक्षकांचेही लक्ष वेधले होते. बॉक्स ऑफिसवरही चित्रपटाने यश मिळवले होते. आता शिक्षण क्षेत्रातील वास्तव आणि सामाजिक विषमता यांसारख्या संवेदनशील विषयांवर भाष्य करणारा 'जयंती २'ही तितकाच प्रभावी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नुकताच प्रदर्शित झालेला टीझर भावनिक, विचारप्रवर्तक आणि प्रभावी वाटत असून, त्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. ११ सप्टेंबर रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठी खळबळ!

## व्हिसा प्रक्रियेत नियमभंग; हमजा नजरवर २ वर्षांची बंदी अन् १० लाखांचा दंड

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तानचा क्रिकेटपटू हमजा नजर मोठ्या अडचणीत सापडला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने हमजा नजरवर २ वर्षांची बंदी घातली आहे. यादरम्यान त्याच्यावर दंड देखील आकारण्यात आला आहे. ही बंदी घातल्यानंतर तो केवळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट नव्हे, तर देशांतर्गत क्रिकेटमधील कुठल्याही स्पर्धेत खेळू शकणार नाही. काय आहे प्रकरण? त्याच्यावर बंदी घालण्याचं नेमकं कारण काय?**



पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, पीसीबी मार्फत व्हिसासाठी अर्ज करत असताना हमजा नजरने चुकीची माहिती दिली होती. त्यानंतर त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. ज्यावेळी चौकशी करण्यात आली, त्यावेळी असं लक्षात आलं की, त्याने अपूर्ण आणि चुकीची माहिती दिली होती. त्याने खऱ्या गोष्टी लपवणारी आणि दिशाभूल करणारी माहिती दिली. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने समिती तयार केली होती. यादरम्यान पीसीबीने हमजाला आपली बाजू मांडण्याची संधीही दिली होती.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, हमजा नजरवर कुठल्याही आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत किंवा देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमध्ये सहभागी होण्यावर २ वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय १० लाख पाकिस्तानी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बोर्डाकडून ३ सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. यासह हमजाला आपली बाजू मांडण्याची संधी देखील देण्यात आली होती. त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, उपलब्ध माहितीची समीक्षा केल्यानंतर, आणि संबधित परिस्थितींचा विचार केल्यानंतर समितीने आपला अहवाल पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडे सुपूर्द केला आहे.

PCB
Pakistan Cricket Board

### कोण आहे हमजा नजर?

हमजा नजर हे नाव पाकिस्तान क्रिकेटमध्ये अजूनतरी फारसं चर्चेत नाही. २७ वर्षीय हमजाला भारतीय संघासाठी पदार्पण करण्याची संधी मिळालेली नाही. आतापर्यंत १६ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये त्याने ७४८ धावा केल्या आहेत. तर गोलंदाजी करताना त्याने २६ गडी बाद केले आहेत. तर लिस्ट ए क्रिकेटमध्ये त्याने १५ सामन्यातील १३ डावांत फलंदाजी करताना १९२ धावा केल्या आहेत. तर गोलंदाजी करताना त्योन १८ गडी बाद केले आहेत.

# इंग्लंडच्या स्टार खेळाडूची वयाच्या २५ व्या वर्षी तडकाफडकी निवृत्ती

**महाईन्यूज । इंग्लंड**

**इंग्लंड क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. कारण वेगवान गोलंदाज जॉन टर्नरने वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी निवृत्तीची घोषणा केली आहे. मुख्य बाब म्हणजे २०२४ मध्ये त्याने इंग्लंडसाठी पदार्पण केलं होतं. त्यानंतर त्याला ४ सामने खेळण्याची संधी मिळाली. २ वर्षांपूर्वीच त्याच्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात झाली होती. ज्या वयात अनेकांना पदार्पण करण्याची संधी देखील मिळत नाही, अशा वयात त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.**




आंतराष्ट्रीय क्रिकेटमध्ये असे अनेक खेळाडू आहेत, ज्यांना वयाच्या ३० व्या वर्षी पदार्पण करण्याची संधी मिळाली आहे. जॉन टर्नरची कारकिर्द जर वयाच्या २३ व्या वर्षी सुरु झाली होती, तर मग २५ व्या वर्षी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा का केली? असा प्रश्न तुम्हालाही पडलाच असेल. त्याने दुखापतीमुळे क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. पाठीच्या दुखापतीमुळे तो जून २०२५ पासून एकही सामना खेळू शकला नव्हता. तो दुखापतीतून पूर्णपणे फिट होऊ शकला नाही. त्यामुळे त्याने टोकाचं पाऊल उचलत प्रोफेशनल क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.

जॉन टर्नरचा जन्म दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गमध्ये झाला. पण त्याच्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. तो हॅम्पशायर संघासोबत करारबद्ध आहे. या संघासोबतचा करार संपायला अजूनही २ वर्ष शिल्लक आहेत. त्याआधीच त्याने निवृत्तीची घोषणा केली आहे. दरम्यान २०२४ मध्ये त्याला इंग्लंडकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली. इंग्लंडचा संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर असताना त्याने इंग्लंडकडून २ वनडे आणि २ टी-२० सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याने ३ गडी बाद केले होते. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने दमदार कामगिरी केली होती. पण, दुखापतीमुळे त्याला बराच काळ मैदानापासून दूर राहावं लागलं.

### निवृत्तीनंतर जॉन टर्नर काय म्हणाला?

निवृत्तीचा निर्णय घेतल्यानंतर जॉन टर्नर म्हणाला, “मी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण निर्णयांपैकी एक होता. पाठीच्या स्ट्रेस फ्रॅक्चरमुळे मी एक वर्षाहून अधिक काळ मैदानापासून दूर राहिलो आहे. माझ्या दुखापतींनी मला क्रिकेटमधील आणि क्रिकेटबाहेरील माझ्या भविष्याबद्दल विचार करण्यास भाग पाडले. त्यामुळे मला वाटले की, आयुष्यात नवीन आव्हानं स्वीकारण्याची हीच योग्य वेळ आहे.”

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।

दि. 08 ऑगस्ट 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

SCAN TO APPLY



# B.Sc. FORENSIC SCIENCES (Hons.)

## Be the Reason Behind the Truth.

A multidisciplinary program that blends science, technology and investigation to analyze evidence, solve crimes and deliver justice.

### WHY CHOOSE THIS PROGRAM?

**EXPERIMENTAL LEARNING**
Hands-on training in modern laboratories, crime scene simulation and case studies.

**FUTURE-READY SKILLS**
Exposure to DNA Technologies and advanced analytics.

**FLEXIBLE CAREER PATHS**
Choose between industry internships, research projects or dissertation to become a specialist in your domain.

### WHAT YOU WILL LEARN

- Crime Scene Investigation
- Forensic Biology & DNA Analysis
- Forensic Chemistry & Toxicology
- Forensic Psychology
- Cyber Forensics
- Criminology & Criminal Law
- Digital & Computational Forensics

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# ५६ हजार हरकतींनी विकास आराखडा गाजला!

## सुनावणीला अल्प उपस्थिती; पिंपरीतील आरक्षणांवर सर्वाधिक आक्षेप

7. Pimpri: Demand to change the purpose of Reservations (एकूण अर्ज:- ३३६३)







### सर्वाधिक हरकती पिंपरीतून...

सर्वाधिक हरकती पिंपरी भागातून नोंदवल्या गेल्या आहेत. आ.क्र. २/१९ (MUNICIPAL PURPOSE), २/२० (POLICE STATION) आणि २/२१ (BUS TERMINUS) या आरक्षणांसंदर्भात तब्बल ५,८३८ अर्ज प्राप्त झाले आहेत. म्हणजेच, ज्या जागेवर आता माता रमाई आंबेडकर स्मारकाचे काम सुरू झालेले आहे. त्या ठिकाणी असे स्मारक नव्या डीपीतून हद्दपार होत होईल किंवा आरक्षण रद्द केले आहे, असा कांगावा काही स्थानिक नेत्यांनी केला होता. मात्र, त्या ठिकाणी तांत्रिक बाजू पूर्ण करुन स्मारकाचे काम थाटा-माटात सुरू करण्यात आले. त्यापाठोपाठ याच भागातील आणखी एका प्रस्तावाला — जिथे PLAY GROUND, DISPENSARY, HIGH SCHOOL, GROUND आणि RETAIL MARKET या विद्यमान आरक्षणांचा वापर बदलून मुस्लीम समाजासाठी उर्दू शाळा, कॉलेज, हज हाउस, सांस्कृतिक भवन व धार्मिक कार्यक्रमांसाठी जागा राखीव करण्याची मागणी करणाऱ्या प्रस्तावाला — ३,३६३ अर्जांद्वारे प्रतिसाद मिळाला आहे.

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रारूप विकास योजनेवर (DRAFT DEVELOPMENT PLAN) नागरिकांनी मोठ्या संख्येने आक्षेप नोंदवले असून, एकाच विषयाशी संबंधित तब्बल ३७,४७९ हरकती-सूचना प्राप्त झाल्या आहेत. स्मशानभूमी, रस्ते रुंदीकरण, आरक्षण बदल आणि सार्वजनिक सुविधांच्या जागांबाबत विविध भागांतील नागरिकांनी आक्षेप नोंदवले आहेत. मात्र, या हकरतींवर सुनावणी सुरू झाली. दि. ३ ऑगस्टपासून आजपर्यंत अत्यल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे या हरकती आणि सूचना त्यावेळी तोंडावर असलेल्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण निर्मिती करण्यासाठी फुगवण्यात आल्या होत्या का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

### स्मशानभूमींवरून वाद

शहरातील तीन वेगवेगळ्या भागांत स्मशानभूमी (BURIAL GROUND) आरक्षणावरून नागरिकांमध्ये संभ्रम व नाराजी दिसून येते:
चिखली येथे आ.क्र. ५/१२१ ही स्मशानभूमी रद्द करावी की कायम ठेवावी, यावर ४,३१८ अर्ज प्राप्त झाले. सांगवी येथे आ.क्र. ४/८६ ही स्मशानभूमी रद्द करण्याच्या मागणीसाठी ४,१२४ अर्ज आले. किवळे येथे आ.क्र. ८/७९ स्मशानभूमी व ८/८० सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STP) याबाबत १,७०० अर्ज नोंदवले गेले.

| अ.क्र. | गाव | प्रारूप विकास योजनेवरील बहुसंख्य अर्ज विषय | सूचना/हरकत अर्ज संख्या |
|---|---|---|---|
| १ | किवळे | आ.क्र. ८/७९ Burial Ground व आ.क्र. ८/८० Sewage Treatment Plant | १७०० |
| २ | तळवडे | घरजाई माता मंदिराजवळ २४ मी. रुंदीचा विकास योजना रस्ता | ४४१८ |
| ३ | रहाटणी | आ.क्र. ४/३९ Extn. Garden | १३४३ |
| ४ | थेरगाव | स.नं. ७,८,१०,११ पडवळ नगर येथील २४ मी. रुंदीचा विकास योजना रस्ता | २९३९ |
| ५ | PCMC | HCMTR (High Capacity Mass Transit Route) | २४३५ |
| ६ | पिंपरी | आ.क्र. २/१९ Municipal Purpose, २/२० Police Station, २/२१ Bus Terminus | ५८३८ |
| ७ | पिंपरी | आ.क्र. २/२२ Play Ground, २/२३ Dispensary & Maternity Home and Library, २/२४ High School, २/२५ Ground, २/२६ Retail Market - आरक्षण वापर बदल करून मुस्लीम समाजासाठी उर्दू शाळा, कॉलेज, हज हाउस, सांस्कृतिक भवन, धार्मिक कार्यक्रमासाठी जागा आरक्षित करणे | ३३६३ |
| ८ | चिखली | आ.क्र. ५/१२१ Burial Ground रद्द करणे/कायम ठेवणे बाबत | ४३१८ |
| ९ | सांगवी | आ.क्र. ४/८६ Burial Ground रद्द करणेबाबत | ४१२४ |
| १० | मोशी | आ.क्र. ५/२२० SH (Slaughter House) | २७५४ |
| ११ | चिखली | आ.क्र. ५/२५५, ५/२५६ — SACC (Super Administrative-cum-Commercial Complex) | १४९२ |
| १२ | पिंपरी | DP roads continued in Draft DP as Per Sanctioned DP | ८०० |
| १३ | चिंचवड | 24 meter wide road | ७०० |
| १४ | चऱ्होली | आ.क्र. ६/२५५ Joggers Park | १७५ |
| १५ | चऱ्होली | आ.क्र. ६/१९९ Stadium | २६४ |
| १६ | वाकड | 18 & 24 m DP road | ४९३ |
| १७ | | पूररेषा | ३२३ |
| एकूण बहुसंख्य अर्ज संख्या | | | ३७,४७९ |

### रस्ते रुंदीकरणाला विरोध

अनेक भागांत प्रस्तावित रस्त्यांच्या रुंदीकरणाबाबतही नागरिकांनी आक्षेप घेतले आहेत : तळवडे येथे घरजाई माता मंदिराजवळील २४ मीटर रुंद रस्त्यासाठी ४,४१८ अर्ज, थेरगाव येथील पडवळ नगर परिसरातील २४ मीटर रस्त्यासाठी २,९३९ अर्ज, वाकड येथील १८ व २४ मीटर रस्त्यांसाठी ४९३ अर्ज, तर चिंचवड व पिंपरी भागातील रस्ते मंजूर विकास योजनेप्रमाणेच कायम ठेवण्याबाबत अनुक्रमे ७०० व ८०० अर्ज प्राप्त झाले.

### इतर महत्त्वाचे मुद्दे

मोशी येथील प्रस्तावित कत्तलखान्या (SLAUGHTER HOUSE, आ.क्र. ५/२२०) विरोधात २,७५४ अर्ज, तर चिखली येथील SACC (SUPER ADMINISTRATIVE-CUM-COMMERCIAL COMPLEX) प्रकल्पाबाबत १,४९२ अर्ज नोंदवले गेले. पिंपरी-चिंचवडमधील HCMTR (हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रूट) प्रकल्पावरही २,४३५ अर्जांद्वारे आक्षेप घेण्यात आले आहेत. रहाटणी येथे बागेच्या (GARDEN) विस्तारीकरणाबाबत १,३४३ अर्ज, चऱ्होली येथे जॉगर्स पार्क आणि स्टेडियम आरक्षणांबाबत अनुक्रमे १७५ व २६४ अर्ज, तर पूररेषेसंदर्भात (FLOOD LINE) ३२३ अर्ज प्राप्त झाले आहेत.

### सुनावणीला मात्र नागरिकांचा अल्प प्रतिसाद

एकीकडे हरकती-सूचनांचा आकडा मोठा असला, तरी प्रत्यक्ष सुनावणीला उपस्थिती मात्र अत्यल्प असल्याचे चित्र आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारूप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या एकूण ५६,७७१ हरकतींवर सोमवारपासून (दि. ३) आकुर्डी येथील ग.दि. माडगुळकर नाट्यगृहात सुनावणी सुरू झाली आहे. मंगळवारी (दि. ४) पिंपरी भागातील आरक्षणांवर दुसऱ्या दिवशीची सुनावणी घेण्यात आली, ज्यात मोबाईल, ई-मेल व पत्राद्वारे तब्बल २,५०० जणांना नोटिसा पाठवूनही केवळ १२३ हरकतदार प्रत्यक्ष हजर राहिले. पहिल्या दिवशी हा आकडा त्याहूनही कमी, अवघा २२० इतका होता. दि. ६, ७ आणि ८ या तीन दिवसांतही हरकतदारांचा प्रतिसाद नगण्य पहायला मिळाला आहे.

भाजपाने मतदार पडताळणी (SIR), बूथनिहाय संघटनबांधणी आणि प्रभागनिहाय निवडणूक तयारीला वेग दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडून बैठकांवर जोर दिला आहे. सोबतच एसआयआर साठी कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यामुळे “राष्ट्रवादीला भाजपाची धास्ती लागली आहे का?” असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

वास्तविक, भाजपाने बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, पन्नाप्रमुख आणि एसआयआर मोहिमेद्वारे मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी व्यापक मोहीम सुरू आहे. त्याला यश मिळताना दिसते. गेल्या काही महिन्यांत भाजपाने शहरात संघटन विस्तारावर विशेष भर दिला आहे. प्रत्येक प्रभागात कार्यकर्त्यांची फळी उभी करणे, नवीन मतदारांपर्यंत पोहोचणे आणि निवडणुकीसाठी सूक्ष्म नियोजन करणे या रणनीतीवर पक्ष काम करत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थापनेपासून २०१७ पर्यंत पिंपरी-चिंचवडमध्ये निर्विवाद सत्ता असलेल्या राष्ट्रवादीला आता विरोधी बाकावर बसावे लागले आहे. शहरातील तीनपैकी दोन विधानसभा, दोन पैकी एक लोकसभा आणि १२८ पैकी ८५ नगरसेवकपदाच्या जागांवर पराभव पत्करावा लागला आहे. आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक पातळीवरील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे राष्ट्रवादीसमोर पूर्वीची ताकद कायम ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अनेक नेत्यांची पक्षांतरं, बदलते सामाजिक समीकरण आणि भाजपाचे वाढते संघटन यामुळे राष्ट्रवादी अधिक आक्रमक भूमिका घेत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. पिंपरी चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक (भीमसृष्टी) शेजारील मैदान — सर्व्हे क्रमांक २/२० (पोलिस स्टेशन) व २/२१ (बस टर्मिनल) तसेच म्युन्सिपल पर्पज आरक्षण — याबाबत सर्वाधिक हरकती दाखल झाल्या असून, ही आरक्षणे रद्द करण्याची मागणी उपस्थित नागरिकांनी सुनावणी समितीसमोर केली. सुनावणीस समितीचे सात सदस्य तसेच विशेष नियोजन व नगररचना विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी भागातील सुनावणी १४ ऑगस्टपर्यंत चालणार असून, नोटीस मिळूनही अद्याप उपस्थित राहू न शकलेल्या हरकतदारांना अखेरच्या दिवशी, १४ ऑगस्टला, उपस्थित राहण्याची अंतिम संधी दिली जाणार आहे. प्रत्येक भागाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतरही गैरहजर नागरिकांना पुन्हा संधी दिली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# मोशी दुर्घटनेतील ७ कुटुंबांना आर्थिक आधार

## वारसांच्या खात्यात प्रत्येकी १० लाख रुपये जमा; दोन कुटुंबांना कागदपत्रांची प्रतीक्षा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून जलद गतीने सुरू आहे. महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्यात येत असून, कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.**



> “मोशी दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना शक्य तितक्या लवकर आर्थिक दिलासा मिळावा, ही महानगरपालिकेची भूमिका आहे. कोणत्याही मृत कर्मचाऱ्याच्या वारसांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाला आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उर्वरित मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांची आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच नियमानुसार आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाईल.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> “मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात येत आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच पात्र वारसांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा केली जात आहे. उर्वरित लाभार्थ्यांची कागदपत्रे प्राप्त होताच त्यांनाही विलंब न लावता आर्थिक मदत वितरित करण्यात येईल.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

आतापर्यंत मृत अक्षय सावंत (वय ३५), सन्नी माने (वय ३९), राहुल गायकवाड (वय ३५), वामन कसबे (वय ३५), नागेश गायकवाड (वय २६), सुनील कोरके (वय ४०) आणि रणजीत पाटील (वय २२) यांच्या कायदेशीर वारसांच्या बँक खात्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत नियमानुसार थेट जमा करण्यात आली आहे.

दुर्घटनेतील मृत भावेश वाणी आणि महेश कुंभार यांच्या कायदेशीर वारसांच्या कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नसल्याने त्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम जमा होऊ शकलेली नाही. संबंधित कागदपत्रे प्राप्त होताच आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या वारसांच्या खात्यातही नियमानुसार आर्थिक मदतीची रक्कम तातडीने जमा करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# भामा-आसखेड प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर टप्प्याटप्प्याने कार्यवाही



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्पाच्या अनुषंगाने शिवे–वाकी तर्फे वाडा येथील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आज महापौर रवि लांडगे यांची भेट घेऊन गावातील प्रलंबित विकासकामे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.**

### पाणीप्रकल्पासोबत ग्रामस्थांचे हितही जपणार

भामा-आसखेड प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांवर महापौर रवि लांडगे यांच्यासोबत चर्चा झाली. शहराच्या पाणीपुरवठ्याला बाधा न आणता ग्रामस्थांच्या प्रश्नांवर कार्यवाही करण्याचा निर्णय.

यावेळी ग्रामस्थांनी भामा-आसखेड प्रकल्पासाठी दिलेल्या सहकार्याच्या पार्श्वभूमीवर गावातील पाणीपुरवठा व जलवाहिनीची प्रलंबित कामे, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे काँक्रिटीकरण, वीजपुरवठा, सांडपाणी व गटार व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, स्मशानभूमी व परिसराचे सुशोभीकरण, मंदिर परिसरातील आवश्यक सुविधा, सभागृह, खेळाचे मैदान, वृक्षारोपण तसेच इतर मूलभूत विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच भामा-आसखेड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ग्रामस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर महापालिका प्रशासनामार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामस्थांनी विविध मागण्या मांडल्यानंतर महापौर रवि लांडगे यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा केली. प्रत्येक मागणीची वस्तुनिष्ठ माहिती घेऊन संबंधित विभागांमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या आणि गावाच्या विकासकामांबाबत सकारात्मक भूमिका घेऊन टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

महापौर रवि लांडगे म्हणाले, “भामा-आसखेड प्रकल्प हा पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. शहराच्या पाणीपुरवठ्याला कोणत्याही परिस्थितीत बाधा येऊ न देता हा प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येईल. त्याचवेळी या प्रकल्पासाठी मोलाचे योगदान दिलेल्या प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या, प्रलंबित प्रश्न आणि गावाच्या विकासकामांकडेही संवेदनशीलतेने पाहून त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात येतील. शहराचा विकास आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांचे हित या दोन्ही बाबींचा समतोल राखत प्रशासनामार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल.”

यावेळी ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध विषयांबाबत संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यावर भर देण्यात आला. गावातील प्रलंबित विकासकामे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांचे प्राधान्याने आणि टप्प्याटप्प्याने निराकरण करण्यासाठी महापालिका प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच शिवे–वाकी तर्फे वाडा येथील पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### भामा-आसखेड प्रकल्पग्रस्तांना दिलासा



शिवे–वाकी तर्फे वाडा येथील ग्रामस्थांनी महापौर रवि लांडगे यांची भेट घेऊन विविध प्रलंबित विकासकामे व प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर चर्चा केली. शहराच्या पाणीपुरवठ्याला बाधा न आणता ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्यांवर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याचे आश्वासन महापौरांनी दिले.

DTE Code
**6310**

Approved by AICTE · Accredited by NAAC · Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**

Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507